# पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ

## प्रेस नोट दिनांक :-२९/११/२०२२

---

## ऑनलाईन फसवणुकीतील ९ लाख रुपये परत (refund)
## सायबर सेल, यवतमाळ यांची कामगिरी

**रविवार** दिनांक-२७/१०/२०२२ रोजी संतोष मनोहरराव अंगईतकर रा. रविराजनगर यवतमाळ यांना मो.क्रं. ८२४९७५७११२ यावरुन फसवणुकीचे कॉल आला. कॉलवरील व्यक्तीने संभाषण करताना बोलण्याचे ओघात क्रेडीट कार्ड अपडेट करण्याचा बहाणा सांगुन त्यांचे मोबाईलमध्ये एक्सेस करुन ईंटरनेट बॅकींगचा उपयोग करुन त्याद्वारे बँके खात्यामधुन ९ लाख ५६ रुपये पैसे वळते केले. तक्रारदार यांची फसवणुक झाल्याचे त्याचे लक्षात येताच त्यांनी लागलीच अवधुतवाडी पोस्टे गाठले. तेथुन त्यांना सायबर सेल, यवतमाळ येथे संपर्क करण्याबाबत सांगितल्याने त्यांनी तात्काळ सायबर सेल येथे धाव घेतली, सायबर येथील अधिकारी व अमंलदार यांनी तात्काळ तक्रारदार यांचेकडील माहिती घेवुन सुट्टीचा दिवस असतानाही स्टेट बॅकसोबत संपर्क केला. तेव्हा पुसद येथील स्टेट बँकचे कर्मचारी श्री. स्वप्नील यांनी ताक्ताळ प्रतिसाद देत घटनेचे गांभीर्य पाहुन कार्यवाही करित तक्रारदार यांचे खात्यामधुन गेलेले खात्यामधुन ९ लाख ५६ रुपये होल्ड करण्याकरिता प्रयत्न केल्याने सायबर सेल यवतमाळ यांना नमुद तक्रारदार यांचे ९ लाख ५६ रुपये होल्ड करण्यामध्ये यश आले आहे. याबाबत पोस्टे अवधुतवाडी येथे अपराध क्रं.११८०/२०२२ कलम ४२० भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा नोदं करण्यात आला असुन तपास सुरु आहे.

सदरची कार्यवाही डॉ. पवन बन्सोड पोलीस अधीक्षक, यवतमाळ, श्री. पियुष जगताप अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि विकास मुंढे, पोलीस शिपाई अजय निंबोळकर ब.नं.९८०, नापोशी प्रविण कुथे ब.नं. २२८७ सायबर सेल यवतमाळ यांनी पार पाडली.

याद्वारे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, आपल्याला लॉटरी, जॉब ऑफर, ईलेक्ट्रीक बिल, क्रेडीट कार्ड, ऑनलाईन लोन किंवा ५ जी अपडेट ईत्यादीबाबत मोबाईल नंबरवरुन कॉल आल्यास अशा प्रकारच्या कोणत्याही अनोळखी कॉलला प्रतिसाद देवु नका किंवा कोणत्याही लिंकवर खात्री झाल्याशिवाय क्लीक करु नये. त्याचप्रमाणे Google वर Costumer care contact number सर्च करताना खात्री केल्याशिवाय सर्च केलेल्या मोबाईल क्रंमाकावर संपर्क करु नका. दुर्दैवाने आपल्यासोबत सायबर क्राईमचा प्रकार घडल्यास तात्काळ सायबर सेल येथे संपर्क करावा. तसेच १९३० या हेल्पलाईन नंबरवर संपर्क साधावा किंवा www.cybercrime.gov.in या पोर्टलवर जावुन सायबर क्राईमबाबत ऑनलाईन तक्रार नोंदविता येईल.

**(पियुष जगताप)**
अपर पोलीस अधिक्षक,
यवतमाळ